# होमीओपॅथीक आर्सेनिक अल्बम ३० हे औषध खरेदी संदर्भात कार्यवृत्त

## दिनांक ०१/१०/२०२०

ग्राम विकास विभाग महाराष्ट्र शासन शासन निर्णय दिनांक ३० जुन २०२० नुसार १४ व्या वित्त आयोगाच्या व्याजाच्या रक्कमेतून होमीओपॅथीक आर्सेनिक अल्बम ३० हे औषध खरेदी करून जिल्हयातील ग्रामीण जनतेला वितरित करण्याबाबत कळविले आहे. याकरीता शासन निर्णय दिनांक १ डिसेंबर २०१६ च्या मार्गदर्शक सुचनेनुसार खरेदी करण्याबाबत सुचविले आहे.

त्या अनुषंगाने १४ व्या वित्त आयोगाच्या व्याजाची रक्कम ही १,३५,०३६८४/- एवढी रक्कम जिल्हा स्तरीय खात्यात शिल्लक असल्याने तेवढया रक्कमेची खरेदी करण्याचे ठरविले. सदर खरेदी करण्याकरीता निविदा समिती ची स्थापना करण्यांत आली.

त्या अनुषंगाने सदर होमीओपॅथीक आर्सेनिक अल्बम ३० खरेदी संदर्भात दिनांक ०९ जुलै २०२० रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद नागपूर यांचे अध्यक्षतेखाली निविदा समीतीची बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत जिल्हा शल्यचिकीत्सक ,जिल्हा आरोग्य अधिकारी व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचा.) उपस्थीत होते.सदर व्याजाची रक्कम व जिल्हयाची लोकसंख्या विचारात घेता केवळ आर्सेनिक अल्बम ३० घेण्याचे ठरले .

शासन आदेश ७ जुलै २०२० नुसार खरेदी तात्काळ करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत.परंतु शासन निर्णय ७ ऑक्टोंबर २०१७ अन्वये खरेदी रु.५०.०० लक्ष पेक्षा अधिक असल्याने जिल्हा परीषद सर्वसाधारण सभेची प्रशासकिय मान्यता घ्यावी लागणार असल्याने दिनांक २४ जुलै २०२० रोजी रूपये १,३५,०३६८४/- एवढया रक्कमेला खरेदी करण्याकरीता जिल्हा परीषद सर्वसाधारण सभेने प्रशासकिय मान्यता प्रदान केली .

शासन परिपत्रक क्रमांक कोरोना-२०२०/प्र.क्र.४८/वित्त ४, दिनांक २० ऑगस्ट २०२० अन्वये रूपये ३.८७ प्रति बॉटल (३५ गोळया) या न्युनतम दराने खरेदी करण्याबाबत सुचविलेले होते. परंतु निवीदा समितद्वारे होमीओपॅथीक आर्सेनिक अल्बम ३० हे औषध खरेदी करण्याकरीता कोल्हापूर व रत्नागीरी जिल्हा परिषदेने खरेदी केलेल्या दरासंदर्भात दिनांक ०२ सप्टेंबर २०२० रोजी मा.उपसचिव ग्राम विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचेशी झालेल्या चर्चेत मा.उप सचिव यांनी जिल्हा परिषद रत्नागीरीचे दर न्यूनतम असल्याने या दराने खरेदी करण्याबाबत सुचना दिल्या व रत्नागीरी जिल्हा परिषदचे पुरवठा आदेश पाठविले. तसेच मा.मंत्री ग्रामविकास विभाग व मा. अति. मुख्य सचिव यांचे दिनांक ९ सप्टेंबर २०२० च्या झालेल्या व्ही.सी. मध्ये व दिनांक ११ सप्टेंबर २०२० च्या पत्रानुसार तातडीने खरेदी करण्याबाबत निर्देश दिलेले आहे.त्यानुसार ७.१३ रू. प्रति बॉटल १०० गोळया या निश्चित दराने खरेदी करण्याचे ठरले.

त्या अनुषंगाने दिनांक १० सप्टेंबर २०२० रोजी मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षेतेखालील जिल्हास्तरीय खरेदी समितीद्वारे सदर खरेदीस तांत्रिक मान्यता प्रदान करण्यांत आली. दर निश्चित असल्याने ई निविदा न मागविता उदयोग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भाखस २०१४/प्र.क्र.८२/भाग ३/उदयोग ४ दिनांक १ डिसेंबर २०१६ मधील मुद्या क्रमांक ३.२.८अन्वये आनलाईन पध्दतीने EOI ( अभिव्यक्ती स्वारस्य) मागविण्याचे निश्चित करून याबाबत मसुदा तयार करण्यात आला.मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांनी मसुदयाला अंतिम मंजूरी प्रदान केली.

त्या अनुषंगाने मंजूर खरेदी करण्यासंदर्भात EOI ( अभिव्यक्ती स्वारस्य) Maha Etenders या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यांत आले. यासदंर्भात दिनांक १६ ते २४ सप्टेंबर २०२० पर्यत EOI ( अभिव्यक्ती स्वारस्य) भरण्याबाबत कालावधी देण्यात आला होता. तसेच दिनांक २१ सप्टेंबर २०२० ला या प्रक्रियेत भाग घेणाऱ्या संस्थांची प्रि बीड मिटींग घेण्याचे ठरलेले असल्याने या दिवशी खालील २ बीडर / प्रतिनिधी उपस्थीत होते.

१. श्री.के.एस.शर्मा - मेयोन्स फार्मा नागपूर

२. श्री.प्रशांत सिंग - सुमन होमीओ फार्मसी पुणे

दिनांक २८ सप्टेंबर २०२० ला Maha Etenders या संकेतस्थळावरून EOI ( अभिव्यक्ती स्वारस्य) उघडण्यात आले.त्यात एकूण ५ संस्थानी भाग घेतल्याचे दिसून आले. त्यांची नांवे अनुक्रमे

१) सुमन होमीओ फार्मसी पुणे
२) पायोनिअर होमीओ फार्मा प्रा.लि. हैद्राबाद
३) चांडक मेडीकल स्टोअर्स चंद्रपूर
४) द पंजाब होमीओपॅथीक फार्मसी ॲड अदर्स को-ऑपरेटीव्ह इंडस्ट्रीयल सोसायटी ली. मोहाली
५) चैतन्य एटंरप्रायजेस पुणे

या पाचही संस्थाचे Maha Etenders या संकेतस्थळावर त्यांनी अपलोड केलेले दस्ताऐवज डाऊनलोड करून प्रिटं घेण्यांत आली. निविदा समितीद्वारे कागदपत्राची पडताळणी करण्यांत आली. त्यासंदर्भात प्राप्त झालेल्या अभिव्यक्ती स्वारस्य धारकांना दिनांक २८-०९-२०२० रोजी ईमेल/फोन द्वारे कळवून दिनांक २९-०९-२०२० रोजी बैठकीकरीता बोलाविण्यात आले त्यानुसार दुपारी ५.०० वाजता उप मु.का.अ.(ग्रा.पं.) यांचे कक्षात बैठक झाली बैठकीस मा.मु.ले.वि.अ.,मा.अति.जिल्हा आरोग्य अधिकारी व उप मु.का.अ.(पंचायत) उपस्थित होते तसेच अभिव्यक्ती स्वारस्य (EOI) ऑनलाईन भरणारे खालील कंपनीचे प्रतिनिधी उपस्थीत होते.

१) सुमन होमीओ फार्मसी पुणे

२) पायोनिअर होमीओ फार्मा प्रा.लि. हैद्राबाद

३) चांडक मेडीकल स्टोअर्स चंद्रपूर

४) द पंजाब होमीओपॅथीक फार्मसी ॲंड अदर्स को-ऑपरेटीव्ह इंडस्ट्रीयल सोसायटी ली. मोहाली

५) चैतन्य एटंरप्रायजेस पुणे

दिनांक २९/०९/२०२० ला आर्सेनिक अल्बम ३० औषधाचे E.O.I. उघडणे संदर्भात बैठकी करीता उपस्थीत प्रतिनिधी समोर निवीदा समीतीने प्रत्येक संस्थेच्या दस्ताऐवजाबाबत चर्चा केली.तसचे त्यांनी सादर केलेल्या दस्ताऐवजाशिवाय अन्य दस्ताऐवज सादर करायचे असल्यास दि.३०/०९/२०२० ला दुपारी ३.०० वाजेपर्यत सादर करण्याची संधी देण्यात आली. त्याप्रमाणे संस्थांनी दस्ताऐवज सादर केले. कुठल्याही संस्थेने आक्षेप घेतलेला नाही.

संस्था व त्यांनी सादर केलेल्या दस्ताऐवजांनुसार निविदा समितीची निरिक्षणे व शिफारस खालील प्रमाणे आहे.

**१) चैतन्य एटंरप्रायजेस पुणे :-**

चैतन्य एटंरप्रायजेस पुणे या संस्थेचे दस्ताऐवज तपासले असता त्यांनी सादर केलेले उदयोग आधार नोंदणी ही बांधकामाच्या उत्पादना संबधी असल्याचे निदर्शनास येते.त्याच प्रमाणे नोंदणी प्रमाणपत्रामध्ये Services Activity या शिर्षातंर्गत Real Estate Activities on fee or contract basis आणि Other Human Health Activities including independent Ambulance Activities अशी नोंद असल्याचे आढळते चैतन्य एंटरप्रायजेस पुणे ने सादर केलेल्या उदयोग आधार नोंदणीमध्ये औषधी उत्पादनाचा उल्लेख नाही.

संबंधित संस्थेने EMD भरलेली नाही संबंधित संस्था ही बांधकामविषयक उत्पादक असल्याने या प्रकरणी औषध उत्पादकास अपेक्षीत असलेली EMD सुट सदर संस्थेला प्रदान करता येणार नाही असे निविदा समीतीचे मत आहे.

तसेच चैतन्य एंटरप्रायेजसने सीमराज होमीओ फार्मा क्युअर लॅब चे FDA प्रमाणपत्र जोडलेले आहे. परंतु सीमराज होमीओ फार्मा क्युअर लॅब ने चैतन्य होमीओ फार्मा यांना प्रस्तुत अभिव्यक्ती स्वारस्य प्रस्तावामध्ये भाग घेण्याकरीता प्राधिकृत केल्याचे कोणतेही दस्ताऐवज जोडलेले नाही. त्यामुळे चैतन्य एटंरप्रायजेस पुणे हे निवीदा धारक अपात्र ठरत आहेत.

**२) सुमन होमीओ फार्मसी पुणे:-**

सुमन होमीओ फार्मसी पुणे या संस्थेचे दस्ताऐवज तपासले असता Dolosis Homoeo Pharma Pvt.Ltd. चे GMP Certificate जोडलेले आहे.तसेच डोलेसीस कपंनीने त्यांना

Authorization letter दिलेले असून त्यामध्ये authorize Suman Homoeo Pharmacy to apply for Government Tenders from their sister concern called Chirag Enterprises for Homoeopathic Medicine असा उल्लेख आहे. अशा प्रकारे Dolosis Homoeo Pharma Pvt.Ltd. ने Suman Homoeo Pharma तसेच Chirag Enterprises दोघांना या प्रस्तावाकरीता प्राधिकृत केलेले आहे. त्या अनुषंगाने काही दस्ताऐवज Suman Homoeo Pharma व काही दस्ताऐवज Chirag Enterprises यांचे जोडलेले आहे.ही बाब विसंगत वाटते.

सुमन होमीओ फार्मसी यांनी यासोबत स्वत:च्या फार्मसीचे C.A.Audit & Balance Sheet ,Profit & Loss Statement तसेच Turnover Statements जोडलेले आहेत. परंतु Dolosis Homoeo Pharma या मुळ उत्पादक कपंनीचे C.A.Audit & Balance Sheet ,Profit & Loss Statement तसेच Turnover जोडलेले नाही. तसेच EOI मध्ये नमूद केल्या प्रमाणे Non conviction Certificate दाखल केलेले नाही. त्यामुळे सुमन होमीओ फार्मसी पुणे हे निवीदा धारक अपात्र ठरत आहेत.

३) चांडक मेडीकल स्टोअर्स चंद्रपूर:-

चांडक मेडीकल स्टोअर्स चंद्रपूर या संस्थेचे दस्ताऐवज तपासले असता Healwell या कपंनीचे GMP तसेच Drugs & Manufacturing certificate जोडलेले आहे.तसेच Healwell या कपंनीने प्राधिकृत केल्याचे प्रमाणपत्र जोडलेले आहे.त्याबरोबरच Healwell या कपंनीचे उदयोग आधार जोडलेले आहे. ज्यामध्ये Manufacture of Pharmaceuticals Medicine म्हणून उल्लेख आहे. तसेच चांडक मेडीकल स्टोअर्स चंद्रपूर या नांवाचे देखील उदयोग आधार जोडलेले असून त्यामध्ये Services असा उल्लेख आहे.

Healwell या कपंनीने प्राधिकृत केले असले व MSME अंतर्गत कपंनी असलली तरी C.A.Audit & Balance Sheet ,Profit & Loss Statement तसेच Turnover चे कुठलेही दस्तादेवज Healwell कपंनीचे जोडलेले नाही. सर्व दस्ताऐवज चांडक मेडीकल स्टोअर्स या नावांचे आहे तसेच EMD सुध्दा भरलेली नाही. उदयोग आधार Healwell चे जोडलेले आहे. व त्या आधारे EMD सुटीचा लाभ घेतलेला आहे. C.A.Audit & Balance Sheet ,Profit & Loss Statement तसेच Turnover Statements इत्यादी कागदपत्रे Healwell ची असणे आवश्यक आहे.त्याप्रमाणे औषधी Healwell ची असल्याने Healwell एवढया मोठया प्रमाणामध्ये इतक्या कमी कालावधीत औषधी पुरविण्यास सक्षम आहे किंवा कसे हयाची खात्री करावयाची असल्यास Healwell चीच आर्थीक कागदपत्रे आवश्यक आहेत. व EMD सुट याच आधारे घेतलेली असल्याने नोंदणी प्रमाणपत्र , GMP प्रमाणपत्र इ.Healwell

ची जोडली असल्याने आर्थीक दस्ताऐवज देखील Healwell ची जोडणे क्रमप्राप्त असतांना तसे जोडलेले नसल्याने चांडक मेडीकल स्टोअर्स चंद्रपूर अपात्र ठरत आहेत.

४) द पंजाब होमीओपॅथीक फार्मसी ॲड अदर्स को-ऑपरेटीव्ह इंडस्ट्रीयल सोसायटी ली. मोहाली :-

द पंजाब होमीओपॅथीक फार्मसी ॲड अदर्स को-ऑपरेटीव्ह इंडस्ट्रीयल सोसायटी ली._ मोहाली या संस्थेचे दस्ताऐवज तपासले असता कपंनीने सादर केलेले उदयोग आधार मध्ये Manufacture म्हणून उल्लेख आहे. तसेच कपंनीने Non conviction Certificate आणि GMP Certificate सादर केलेले आहे.करीता EMD ची रक्कम भरलेली नाही.सदर कपंनीने सादर केलेल्या C.A.Audit & Balance Sheet,Profit & Loss Statement तसेच Turnover चे दस्ताऐवज सादर केलेले आहे.उदयोग आधार मध्ये (MSME) द पंजाब होमीओपॅथीक फार्मसी व इतर को-ऑपरेटीव्ह इंडस्ट्रीयल सोसायटी असा उल्लेख असल्याने EMD ची रक्कम भरलेली नाही.

सदर कपंनीने आयुष मंत्रालयाचे पत्र सोबत सादर केलेले आहे.सदर पत्रात Manufacture म्हणून आयुष मंत्रालयाकडे नोंदीत असलेल्या कपंनीला ५०% आदेश देण्याचे बंधनकारक असल्याचे नमूद आहे.परंतु महाराष्ट्र शासनाचे दिनांक १ डिसेंबर २०१६ चे शासन निर्णयात असे दिशानिर्देश नाहीत.तसेच यासंदर्भात कोणत्याही प्रकारचे मार्गदर्शका नाही. द पंजाब होमीओपॅथीक फार्मसी व इतर को-ऑपरेटीव्ह इंडस्ट्रीयल सोसायटी मोहाली या कपंनीने सादर केलेले पत्र हे आयुष मिशन अंतर्गत खरेदीसाठी लागू आहे. सदर खरेदी ही आयुष मिशन अंतर्गत नाही. दिनांक १ डिसेंबर २०१६ च्या शासन निर्णया मधील तरतुदींना अनुसरून गुणांकन करण्याचे ठरले.

५) पायोनिअर होमीओ फार्मा प्रा.लि. हैद्राबाद:-

पायोनिअर होमीओ फार्मा प्रा.लि. हैद्राबाद या संस्थेचे दस्ताऐवज तपासले असता सदर कपंनीने GMP Certificate जोडलेले आहे.तसेच उदयोग आधार हे Manufacture of Pharmaceuticals Medicinal Chemical & Botanical products असे नमूद आहे. तसेच Non conviction Certificate जोडलेले आहेत.तसेच अनुभवाचे प्रमाणपत्र जोडलेले आहे. C.A.Audit & Balance Sheet, Profit & Loss Statement तसेच Turnover चे दस्ताऐवज सादर केलेले आहे.

पायोनिअर होमीओ फार्मा प्रा.लि. हैद्राबाद या कपंनीने EOI मध्ये मागविलेले सर्व दस्ताऐवज सादर केलेले आहेत.त्या नुसार गुणांकन करण्याचे ठरले.

वरील सर्व बाबी विचारात घेवून अट क्रमांक १३ व १४ नुसार प्रपत्र ड मध्ये गुणाकंन करण्यात आले.

# ANNEXURE - D

| Sr. No. | Firm Name | Criteria | | | | | | | Total Mark | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | | 2 | | 3 | | 4 | | |
| | | A) If the bidder has an Annual Turnover of 1 Cr in the last three Financial Years. | B) IF the turnover is above 1 Cr., then for every 50 Lac of additional turnover. | A) If the bidder has minimum average annual work experience of 60 Lac for supply of medicinal goods to Govt. or Govt. Corporation or PSU or ULB in India in the last three Financial Years. | B) If the bidder has an Experience of SupplyingMedicinal goods above 60 Lac than every 10 Lac additional amt. | A) CA Audit And Balance sheet of Fin. Year 2017-18, 18-19, 19-20 | B) For each Additional consecutive previous year | If the bidder has a registered corporate/Service Office/SalesOffice in Maharashtra | | |
| | | Marking System | | | | | | | | |
| | | 3 Marks | 1 Additional Marks (up to a max. of 25 marks, including both A &B ) | 3 Marks | 1 Additional Marks (up to a maximum of 25 marks, including both A & B) | 3 Marks | 1 Additional Marks (up to a max. of 10 marks,including both A & B) | 1 Marks | | |
| १. द पंजाब होमीओपॅथीक फार्मसी ॲड अदर्स को-ऑपरेटीव्ह इंडस्ट्रीयल सोसायटी ली. मोहाली | | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | |
| २. पायोनिअर होमीओ फार्मा प्रा.लि. हैद्राबाद | | 3 | 3 | 0 | 0 | 0 | 2 | 0 | 8 | |

परिशिष्ट ड नुसार गुणांकन केले असता पायोनिअर होमीओ फार्मा प्रा.लि. हैद्राबाद यांना सर्वाधिक गुण प्राप्त झाल्याने पायोनिअर होमीओ फार्मा प्रा.लि. हैद्राबाद यांना पुरवठा आदेश देण्याचे निश्चित करण्यांत आले.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.प.)
जिल्हा परिषद नागपूर

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद नागपूर

मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी
जिल्हा परिषद नागपूर

जिल्हा शल्य चिकित्सक
नागपूर

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नागपूर